## - प्रकरण पहिले -

## // ग्रामीण कथा उद्गम व विकास //

ग्रामीण साहित्य हा वाङ्‌मयप्रवाह म्हणून १९६० नंतर मराठी-तील उदयाला आलेला महत्त्वाचा वाङ्‌मयीन प्रवाह आहे. ग्रामीण साहित्य म्हणजे काय, ग्रामीण कथेची पूर्वपीठिका, ग्रामीण कथेच्या प्रेरणा, ग्रामीण कथेच्या विकासाचे टप्पे, ग्रामीण कथेचे मराठी साहित्याला योगदान या मुद्द्यांच्या आधारे या प्रकरणात विवेचन करण्याचे योजिले आहे.

ग्रामीण साहित्य हे ग्रामजीवनातील अनुभूतीचे चित्रण करणारे साहित्य आहे असे ढोबळ मानाने म्हणता येईल. आनंद यादवांनी ग्रामीणतेचा स्वरूप विचार ग्रामीण कथेच्या संदर्भात पुढीलप्रमाणे मांडलेला आहे.

" इतर कथाप्रमाणेच ती (ग्रामीण) एक कथा आहे. ग्रामीण हे तिचे विशेषण आहे. अर्थातच ते वैशिष्टयदर्शक आहे. खेड्यातील व ग्रामातील अनुभूती ग्रामीण कथेतून व्यक्त होते. मानवी जीवनाची अनुभूती म्हणून ती काही खास वेगळी नाही. असे असले तरी खेडेगाव, तेथील जीवनपध्दती, चालीरीती, शेती, तेथील निसर्गाशी, मातीशी, असलेला मानवी पण प्रदेशनिष्ठ वैशिष्टयपूर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्टये मानवी जीवनाला त्याच प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक विषयक मर्यादा व त्यातून उद्भवणारे प्रश्न इत्यादी दृष्टीनुसार अनुभूतीला लाभलेली वैशिष्टये त्या कथेत येतात. ती त्या खास ग्रामीण अनुभूतीतून जन्माला येते. तिचे ग्रामीणत्व या व इतर अनेक कारणांनी डोळ्यांत भरते. तो अनुभुतीचा अपरिहार्य घटक म्हणून येवू लागतो व ती कथा ग्रामीण होते. कथेचा कलाप्रकार म्हणून ती वेगळी नसली तरी वैशिष्टयपूर्णतेमुळे प्रकार म्हणून ती लक्षात येते. " १

ग्रामीण कथा, ग्रामीण साहित्यातील प्रमुख वाङ्‌मयप्रकार त्याचे वैशिष्टय सांगताना डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात,

" ग्रामीण साहित्य हे व्यक्ती केंद्री तर असतेच पण त्या व्यक्तीमत्त्वाच्या जडणघडणीस कृषीकेंद्रीत संस्कृती, या संस्कृतीने निर्माण केलेले लोकमानस या संस्कृतीसाठी निर्माण झालेला गावगाडा ( किंवा तत्सम कृषीउपयोगी समाजरचना) इत्यादी घटक जबाबदार असल्याने त्या व्यक्तिमत्वाला केंद्रस्थानी ठेवून लिहीत असताना उपरोक्त घटक सहजपणे ध्वनीत होत जातात; आणि त्यातून ग्रामीण साहित्य आकार घेत जाते." [2] ही वैशिष्टये ग्रामीण कथेत आपल्या दृष्टोत्पत्तीस येतात.

या ग्रामीण कथेची पूर्वपीठिका व तिचा विकास थोडक्यात पाहणे महत्त्वाचे आहे. हरिभाऊंनी १८९७ मध्ये महाराष्ट्रात जो दुष्काळ पडला होता त्यावर १८९८ च्या सुमारास 'काळ तर मोठा कठीण आला' ही स्फुट गोष्ट लिहली. त्यानंतर ग्रामीण जीवनविषयक साहित्य जाणीवा साधारणपणे १९३१ साली प्रसिध्द झालेल्या वि.स.सुखटणकर यांच्या 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' कथासंग्रहातून व्यक्त झाल्या आहेत. गोव्यातील देवदासींची होणारी कुचंबणा, गावातील भांडणे, वैर, गावकरी व श्रीमंत वतनदार यांच्यातील हेवेदावे, परकियांच्या लाचारीसाठी चटावलेली मनोवृत्ती ही या कथासंग्रहाची वैशिष्टये आहेत. वि.स.सुखटणकरांप्रमाणे लक्ष्मणराव सरदेसाई यांनी गोमंतकीय जीवनाचे चित्रण 'कल्पवृक्षाच्या छायेत', 'सागराच्या लाटा', 'वादळातील नौका', 'ढासळलेले बुरुज' इत्यादी कथासंग्रहातून केले.

१९४१ साली श्री.म.माटे यांनी 'उपेक्षितांचे अंतरंग' हा कथासंग्रह प्रसिध्द केला. त्यामध्ये त्यांनी उपेक्षित, दलित ग्रामीण खेडुतांच्या मनाचे दर्शन घडविले. खरे तर मराठी ग्रामीण कथेचे जनकत्व श्री.म.माटे यांच्याकडे जाते असे प्रा.आनंद यादव यांनी जे म्हटले आहे ते आपणाला पटते. श्री.ग.ल.ठोकळ यांनी जी कथा लिहिली त्यात रंजकता अधिक आहे. खेडेगावातील अज्ञान,तेथील रानदांडगेपणा, माणसामाणसातील हाडवैर, शेतीतील नाट्यपूर्ण प्रसंग, खेडेगावातील सण,उत्सव,प्रेमप्रकरणे यांचे चित्रण त्यांच्या कथांतून येते. १९४३ साली त्यांचा 'कडूसाखर' हा पहिला कथासंग्रह प्रसिध्द झाला.

र.वा.दिघे यांनी १९४० ते ४६ या काळात कथालेखन केले. कोकणाचे जीवन, तेथील गरीबांच्या हालअपेष्टा याचे चित्रण जसे त्यांनी केले तसेच प्रेमाचा त्रिकोणही चित्रित केला. त्यानंतरच्या कालखंडात वामन चोरघडे, रघुनाथ कवठेकर हे लेखक तुरळक ग्रामीण कथा लिहीत होते. ग्रामीण कथेकडे रुचीपालट म्हणून पाहण्याची त्यांची वृत्ती होती. त्यानंतरच्या कालखंडात म.भा.भोसले यांनी कथालेखन केले, त्यांची 'जीवाचा सखा' सारखी कथा एकसुरी झालेली आहे. ती ग्रामीण जीवनाशी प्रामाणिक असूनही सखोल झाली नाही. १९४५ सालापर्यंत मराठी कथेचे सामान्यपणे असे चित्र दिसते. ही मराठी ग्रामीण कथेची १९४५ पर्यंतची पूर्वपीठिका पाहिली की, लक्षात येते या कथेच्या प्रेरणा हरिभाऊंच्या काळात सर्वसाधारण कथेच्याच प्रेरणा होत्या. ठोकळ, दिघे यांच्या साहित्यामागे स्थूल मानाने ना.सी.फडके यांना प्रमाण मानणारी वाङ्‌मयीन प्रेरणा होती; तर श्री.म.माटे यांच्या साहित्यात शुध्द जीवनवादी प्रेरणा दिसते. खऱ्या अर्थाने वेगळ्या, कलावादी प्रेरणेने ग्रामीण कथा १९४५ च्या आसपास लिहिली जाऊ लागली. व्यंकटेश माडगूळकर यांनी माणदेशाचे दर्शन आपल्या ग्रामीण कथांतून घडविले. माडगुळकरांचे 'जांभळाचे दिवस', 'माणदेशी माणसे', 'बाजारची वाट' इत्यादी कथासंग्रह प्रसिध्द झाले. आणि ग्रामीण कथेला एक स्वतःचे स्थान लाभले. माडगूळकरांचे वैशिष्टय म्हणजे त्यांनी साहित्यातून कलात्मक अनुभव कसा प्रकट होतो याचेच आपल्या कथांतून दर्शन घडविले. या संदर्भात प्रा.म.द.हातकणंगलेकर म्हणतात, " माडगूळकरांनी आपल्या ग्रामीण जीवनाची अस्सल व अभिजात नस पकडली. गरिबीच्या दुःखाच्या छायेत वावरणाऱ्या माणदेशी माणसांच्या मागे त्यांची लेखणी सावलीसारखी फिरली. लेखनाचे व जीवनाचे अमेय हित जाणले. तरी देखील निरागस कलात्मकतेची विलक्षण साक्ष ती देतच राहिली."[3]

" रा.रं.बोराडे यांनी व्यंकटेश माडगूळकरांच्या कथांच्या मर्यादा मांडलेल्या आहेत ते म्हणतात, "ज्या माणदेशी माणसाचं जीवन त्यांनी पाहिलं होतं, अनुभवलं होतं त्या माणदेशी माणसाची ओळख त्यांना करून द्यायवयाची

होती. एखाद्या शहरातल्या मित्राला आपण आपल्या खेड्यातून फिरवून आणावे. आपल्या खेड्याची संपूर्ण ओळख करून द्यावी तशा स्वरूपाची ही ओळख होती." [४] असे असले तरी व्यंकटेश माडगूळकरांनी ग्रामीण कथेला एक कलात्मक उंची मिळवून दिली हे आपण मान्य केले पाहिजे.

शंकर पाटलांनी माडगूळकरानंतर लेखनाला १९५१ पासून सुरुवात केली. 'वळीव' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. 'भेटीगाठी', 'धिंड', 'आ', 'वावटी शेंग', 'खुळ्याची चावडी', 'निवडक शंकर पाटील' हे त्यांचे प्रसिद्ध कथासंग्रह. शंकर पाटलांच्या काही विनोदी कथा सोडल्या तर ग्रामीण माणसांच्या जीवनातील दुःख, नात्यागोत्यातील भावबंध त्यांच्या कथेतून व्यक्त झाले आहेत. त्यांच्या विनोदी कथांतून उपहासाबरोबर दुःखाची एक धार सारखी वाहत असते. त्यांच्या कथेत खेड्यातील जीवनापेक्षा खेड्यातील मनेच अधिक व्यक्त झाली आहेत. शंकर पाटलांचे वैशिष्ट्य म्हणजे मानवी मनाच्या चित्रणासाठी पहिल्यांदा त्यांनी संज्ञा प्रवाहाचा लक्षणीय वापर केला. निवेदनासाठी वापरलेली खास वैशिष्ट्यपूर्ण भाषा हे त्यांच्या कथांचे आणखी एक वैशिष्ट्य. ग्रामीण कथेच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे शंकर पाटलांची कथा.

१९४७ च्या सुमारास रणजीत देसाई यांनी कथालेखनास सुरुवात केली. 'रूपमहाल', 'मधुमती', 'कणव', 'वैशाख', 'आलेख' इत्यादी त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कथांतून ग्रामीण जीवनातील सामान्य माणसांची सुखदुःखे, प्राणीसृष्टी, जत्रा, बेंदूर यासारखे सण या सगळ्या जीवनातील मानपान, चढाओढ, मत्सर व भांडणे येतात. त्यांच्या कथेला रंजकतेचे आकर्षण आहे. मानवी जीवनातील एखादाच उत्कट क्षण, रोमहर्षक क्षण देसाई टिपतात. त्यांच्या कथेची संयत भाषा, सूचकता ही वैशिष्ट्ये असली तरी रंजकता, योगायोग, चमत्कृती यामुळे त्यांच्या कथेने मराठी कथेच्या विकासात काही भर टाकलेली नाही. १९४६ च्या सुमारास द.मा.मिरासदार यांनी कथालेखनास सुरुवात केली. 'बापाची

पेंड' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. माणसामाणसातील वेगळेपण, त-हेवाईकपणा, गावापेक्षा वेगळ्या पद्धतीने वागण्याची वृत्ती त्यांच्या कथेत दिसते. ग्राम जीवनातील बढाईखोर, भिताट, इरसाल, कावेबाज, धूर्त, विविहाप्त, नादिष्ट अशी माणसे त्यांच्या कथेतून भेटतात. मिरासदारांच्या कथेने ग्रामीण कथेची लोकप्रियता वाढविली. माणसांच्या स्वभावातील विसंगती, वैशिष्टये विनोदाच्या अंगाने दाखविणे हा ग्रामीण कथेच्या विकासातील एक टप्पा मिरासदारांनी आपल्या कथेतून मांडला.

श्री. म. माटे यांच्यानंतर आण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात या लेखकांनी खेड्यात गावकुसाबाहेर राहणा-या दलितांचे दुःख व्यक्त केले. आण्णाभाऊ साठे यांनी १९४७ च्या दरम्यान लेखनाला सुरुवात केली. त्यांची कथा ही स्वानुभावावर व वास्तवावर आधारलेली कथा आहे. या कथेत दुःख, दैन्य, दास्य आहे. अन्यायाविषयीची चीड, दास्यमुक्तीचा संघर्ष त्यांच्या कथांतून दिसतो. 'भानामती,' 'फरारी,' 'कृष्णाकाठच्या कथा' हे त्यांचे कथासंग्रह प्रसिध्द आहेत. माणसाचे दुःख, त्याचे प्रश्न परिणामकारकपणे त्यांनी मांडले. पण अद्भुतरम्यता व कल्पनाविलासामुळे त्यांची कथा पुन्हा ठोकळ, दिघे यांच्या लेखनाशीच नाते सांगते आहे असे वाटते. आण्णाभाऊ साठे यांच्यानंतर महत्त्वाचे कथाकार शंकरराव खरात. 'बारा बलुतेदार' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. जुन्या ग्रामव्यवस्थेत महार, मांग, रामोशी, कुंभार, कोळी, परीट, न्हावी, सुतार, लोहार, सोनार, गुरव इत्यादींना महत्त्वाचे स्थान होते. त्यांच्या जीवनातील अनुभावावरील कथा त्यांनी गुंफल्या आहेत. शंकरराव खरातांनी ग्रामजीवनातील नवनवी क्षेत्रे आपल्या कथेतून व्यक्त केली. आणि मराठी कथेचे क्षेत्र व्यापक बनविले. खरातानंतरचे महत्त्वाचे कथाकार म्हणजे बाबा पाटील, १९५२ पासून ते कथा लिहीत आहेत. 'एकूर' हा त्यांचा पहिला प्रसिध्द कथासंग्रह. त्यांच्या कथेत भक्ती, मानवाच्या भावना, वासना, शेतक-याची व्यथा, वेदना यांचे दर्शन घडते. याच दरम्यान वि. शं. पारगावकरांनी कथा लिहिल्या. त्यांच्या कथेत प्रामुख्याने नागर जीवनाचे चित्राण येते. पण 'कुळ,' 'खुळं,' 'बीज,' 'हिकमल,' माळावरचा

आंबा' या ग्रामीण कथा. त्यांच्या अविष्कार या कथासंग्रहात आहेत. त्यांच्या कथेत ग्रामजीवनाचे, त्यातील दुःखाचे, रोगाच्या साथीचे, खेड्यातील गुंड, दारूचा व्यवसाय, पोलीसखाते यांचे चित्रण येते. पण हे सगळे चित्रण पाहिल्यावर ग्रामजीवनाचे यथार्थ चित्रण करण्यास त्यांची कथा कमी पडते असे जाणवते.

उध्दव शेळके यांचा 'शिळान अधिक आठ कथा' हा पहिला ग्रामीण कथासंग्रह १९५८ साली प्रसिध्द झाला. विदर्भातील ग्रामजीवनाचे चित्रण त्यांच्या कथांतून येते. या चित्रणाबरोबर शहरात राहूनही हलाखीचे जीवन जगणाऱ्या ग्रामीण कष्टक-यांची दुःखे शेळक्यांनी आपल्या कथांतून मांडली आहेत. ग्रामीण जीवनाचे सखोल दर्शन त्यांच्या कथांतून घडते.

रा.रं.बोराडे यांची वसुली ही कथा १९५७ साली प्रसिध्द झाली पण त्यांचा पेरणी हा कथासंग्रह १९६२ साली वाचकांसमोर आला. त्यांच्या कथेत खेड्यातील दारिद्र्य,कष्ट,मानवी मनाचे ताणतणाव, नात्यागोत्यातील गुंते, नाट्य, स्त्रीचे परावलंबीत्व हे विषय येतात. तसेच ग्रामीण समूह मनाचेही चित्रण येते. त्यांच्या कथेतला निसर्ग वैशिष्टयपूर्ण आहे. मधु मंगेश कर्णिक यांचा 'कोकणी ग वस्ती' हा कथासंग्रह १९५८ ला प्रसिध्द झाला. ग्रामीण माणसाच्या मनातील तरल भावांचे चित्रण, निसर्ग मानव यातील संबंध,स्त्रीजीवनाची वास्तव रेखाटणे, मुलांच्या भावनांचे चित्रण यांचे दर्शन सखा कलाल कलात्मक पातळीवर घडवितात.

चंद्रकुमार नलगे यांनी १९६१-६ पासून कथा लिहिल्या. 'अंगाई,' 'खुळा,' 'रानकरवंद' या त्यांच्या प्रसिध्द कथा. 'पंढरीची वाट' या कथा-संग्रहात ग्रामजीवनातील स्त्री-पुरूषांच्या भावभावना, संस्कार यांचे चित्रण नलगे करतात. त्यांना अद्भुतता, कल्पनारम्यता व रंजकता यांची ओढ आहे. योगायोगाचा वापर कृत्रिमपणे केलेला कथेचा शेवट यामुळे त्यांची कथा वास्तवापासून दूर जाते. र.वा.दिघे,ग.ल.ठोकळ यांच्या कथेशी नाते जोडते.

बी॰ रघुनाथ यांनी मराठवाड्यातील प्रादेशिकतेचे यथार्थ चित्रण केलेले आहे॰ लेखकाच्या काळातील मराठवाड्यातील माणसाचे जे जिणे होते ते त्यांनी आपल्या कथांतून कलात्मकतेने मांडलेले आहेत॰ परिस्थिती आणि माणसे यांना आचवलेल्या माणसांच्या मनातील द्वंद्व त्यांनी आपल्या कथांतून जिवंतपणे चित्रित केलेले आहे॰

मराठवाड्यातील ग्रामीण जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण चंद्रकांत भालेराव, मुकुंदकृष्ण गायकवाड यांनी केले आहे॰ निजाम राजवटीतील अन्याय, त्याविरुद्धचा लढा याचे दर्शन 'धामाची बाब' व 'वाहदूळ' या कथांतून घडते, तर मुकुंदकृष्ण गायकवाड यांच्या 'तिरकट' या कथासंग्रहातून ग्रामीण माणसाचे दुःख, स्त्रीवरील अन्याय, अत्याचार याचे चित्रण पाहयला मिळते॰ रंगराव बापू पाटील हे यानंतर महत्त्वाचे कथाकार॰ 'ल्हावर' हा त्यांचा पहिला कथासंग्रह॰ कथेची नीटस मांडणी विषयाची सुसंगत प्रसंग निर्मिती॰ मनोव्यापार दर्शन ही त्यांच्या कथांची काही वैशिष्ट्ये॰ ग्रामीण जीवनातील वास्तवाचे त्यांचे चांगले आकलन असून रंजकता या दोषामुळे त्यांची कथा ही वैशिष्ट्यपूर्ण ठरत नाही॰

१९७० च्या आसपास लेखन करणाऱ्या ग्रामीण कथालेखकात चारुता सागर यांचा समावेश होतो॰ 'नागीण' हा त्यांचा कथासंग्रह प्रसिद्ध आहे॰ त्यांची कथा ग्रामीण वास्तव व वातावरण याचे प्रत्ययकारी चित्रण करते॰ पण पाल्हाळ व अतिशयोक्ती या मर्यादांमुळे त्यांची कथा वास्तववादी होत नाही॰

याच दरम्यान द॰ता॰भोसले यांनी कथालेखनाला सुरुवात केली॰ ग्रामीण जीवनातील दुःखभोग व विनोद याचे चित्रण त्यांच्या कथांतून येते॰ त्यांच्या कथांचा आपण सविस्तर विचार करणार असल्यामुळे थोडक्यात उल्लेख केला आहे॰ १९७० नंतर लेखन करणाऱ्या कथाकारात योगीराज वाघमारे, भास्कर चंदनशीव, सोपान हाळमकर, गणेश घाडगे, बाबाराव मुसळे, मोहन पाटील, बा॰ग॰केसकर, श्रीराम गुंदेकर, गणेश आवटे, प्रतिमा इंगोले, वासुदेव मुलाटे इत्यादी कथाकारांचा समावेश होतो॰ योगीराज वाघमारे यांनी दलित ग्रामीण माणसांच्या जीवनातील

होरपळीचे व उद्रेकाचे चित्रण केले आहे. 'परागंदा', 'अंधार', 'बायजा' या त्यांच्या कथा प्रसिध्द आहेत. व.वा.बोधे यांची 'फिस्ट' ही कथा गाजली. त्यात ग्रामीण मनाचे दर्शन घडते. भास्कर चंदनशीव यांची 'जांभळ, पुन्ह, मरणकळा' हे दोन कथासंग्रह प्रसिध्द झाले आहेत. खेड्यातील राजकारण, लफडी, दांभिकता, शोषकाचा मस्तवालपणा, रूढी, परंपरांचा जिव्हाळा त्यांच्या कथांतून दिसतो.

सोपान हाळमकर यांनी मराठवाड्यात यंत्रयुग उशिरा कसे आले हे 'रेडू' या कथेतून जसे दाखवले तसेच 'जोडा' या कथेतून आपला नवा जोडा हरवेल म्हणून धोतरात बांधून जेवायला बसलेला पाहुणा चोर कसा ठरला हे लक्षात येते. गणेश धांडगे यांचे 'शिवणावळ', 'चकारी', 'झळया' हे कथासंग्रह प्रसिध्द झाले आहेत. या कथांतून ग्रामजीवनातील रूढी, रीती यांचे प्राबल्य ग्रामीण मनावर कसे असते हे लक्षात येते. महाराष्ट्र राज्यनिर्मितीनंतर ग्रामजीवनात सुधारणा होण्यास प्रारंभ झाला. १९७० नंतर त्यात वेग आला. या बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण बाबराव मुसळे यांनी केले. 'सरकारी हिशोब' या कथेत याचे दर्शन घडते. जमीन मालकाकडून मजुराची कशी कोंडी होते हे येथे लक्षात येते. ग्रामीण भागातला शिकलेला तरूण शहरात गेला की त्याला दुभंगलेपणा अनुभवावे लागते. आनंद पाटील यांच्या 'फुगड्या' सारख्या कथेत याचे दर्शन घडते. नव्या सुधारणा आल्या, त्यामुळे एकसंघ ग्रामव्यवस्था कोलमडून पडली. 'नवी बांधी' सारख्या कथेतून मोहन पाटील यांनी याचे प्रत्ययकारी दर्शन घडविले आहे.

बा.ग.केसकर यांनी 'कानकोंडी' सारख्या कथेतून स्त्रीच्या उपेक्षेचे, अवहेलनेचे चित्र रेखाटले आहे. नवऱ्याने सवत आणल्यावर प्रथम पत्नीची माहेरी व सासरी कशी उपेक्षा होते याचे प्रभावी वर्णन येथे येते.

श्रीराम गुंदेकर यांनी 'उचल' या कथासंग्रहातून खेड्यातील अगतिक, असहाय्य व्यक्तींची पिळवणूक वर्णिली आहे. तसेच शिक्षण संस्थातील राजकारण मांडले आहे. पारंपरिक ग्राम व्यवस्थेतील दलितांच्या उपेक्षित जीवनाचे दर्शन दे.शी.दुधालकर व अमिताभ यांच्या कथांतून घडते. 'कागूद' हा गणेश आवटे यांचा पहिला कथासंग्रह. यातही शोषक व शो/

यांच्या वृत्ती प्रवृत्ती स्पष्ट झाल्या आहेत. प्रतिमा इंगोले यांनी व-हाडी बोलीतून विदर्भातील कष्टकरी ग्रामीण स्त्रियांचे दुःख मांडले आहे. 'सुगरणीचा खोपा,' 'जावयाचे पोर' हे कथासंग्रह प्रसिध्द आहेत.

नागनाथ कोतापल्ले व वासुदेव मुलाटे यांनी जशा नागर जीवनाचे दर्शन घडविणा-या कथा लिहिल्या आहेत तशाच ग्रामीण जीवन दर्शनाच्या कथाही लिहिल्या आहेत. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या 'दिवार,' 'पाऊस' या कथांतून खेड्यातील अंधश्रध्दांवर आधारीत प्रथा व मानवी मनावर त्या प्रथांचा प्रभाव यांचे बारकाईने वर्णन येते. तर वासुदेव मुलाटे यांनी 'अंगठा', 'चाकरी,' इत्यादी कथांतून खेड्यातील कर्जबाजारी माणसांची पिळवणूक मांडली आहे. १९७५ नंतरच्या काळात देखील बदलत्या ग्रामजीवनाचे चित्र राजन गवस सारख्या अनेक कथाकारांनी मांडलेले आहे. १९६० नंतरच्या ग्रामीण साहित्याचा प्रवाह हा एक महत्त्वाचा प्रवाह आहे त्यात कथा हीच प्रमुख आहे. या संदर्भात प्रा. अंबादास माडगूळकर व सूर्यकांत खांडेकर म्हणतात,

" मराठी वाङ्‌मयात ग्रामीण कथेचे स्वतंत्र व समृध्द दालन आहे. नाट्यछटा किंवा विडंबन काव्य हे वाङ्‌मयप्रकार जसे रूढ झाले आणि विराम पावले तसे होण्याची ग्रामीण कथेबाबत भीती नाही. कारण खेड्यात ज्या प्रमाणात सुशिक्षित वर्ग वाढत जाईल त्या प्रमाणात ग्रामीण अनुभवांचे प्रकटीकरण जास्त प्रमाणात होण्याची शक्यता आहे. असे आतापर्यंतच्या अनुभवावरून वाटते. " ५

ग्रामीण कथेने मराठी कथेचे क्षितीज अधिक विस्तारीत केले. जेव्हा ग्रामीण साहित्य चळवळ उभी राहिली ती मराठी कथेला अधिक प्राधान्य देवून असे दिसते.

वरील सर्व विवेचनावरून आपणास पुढील निरीक्षणे नोंदवता येतील.

१) मराठी ग्रामीण कथेची पूर्वपीठिका पाहताना हरिभाऊंच्या 'काळ तर मोठा कठीण आला' या कथेची नोंद घ्यावी लागते.

२) स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रामीण कथा ही ग्रामजीवनातील व्यक्ती-समूह संबंध, परकीयांच्या लाचारीसाठी घटावलेली मनोवृत्ती इत्यादी वैशिष्ट्यांनी आकारास आलेली होती.

३) श्री.म.माटे हे ग्रामीण मराठी कथेचे जनक ठरतात.

४) त्यानंतरच्या ठोकळ, दिघे यांच्या कथेत ना.सी.फडके यांना प्रमाण मानणारी प्रेरणा दिसते.

५) व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेने ग्रामीण कथेला लक्षणीय वळण दिले, कलात्मक अनुभाव कथेतून प्रकट होवू लागला.

६) शंकर पाटील, द.मा.मिरासदार, आण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबा पाटील, वि.शं.पारगावकर, उध्दव शेळके यांनी मराठी ग्रामीण कथेचे क्षितीज विस्तारले. विविध प्रदेशातील भावानुभाव, मनोविश्लेषण, ग्रामजीवनातील दुःख, दारिद्र्य, शोषण यांचा आविष्कार, निवेदनाच्या विविध शैली, संज्ञा-प्रवाहाचे आयोजन ही या कथांची काही महत्त्वाची वैशिष्टये ठरतात.

७) १९६० नंतर आनंद यादव, रा.रं.बोराडे, महादेव मोरे, सखा कलाल, द.ता.भोसले, चारुता सागर इत्यादींनी मराठी ग्रामीण कथा विकसित केली.

८) पश्चिम महाराष्ट्राबरोबर विदर्भ, मराठवाडा या भागातूनही नवे कथाकार आले.

९) सामान्यपणे ग्रामीण कथाकारांच्या चार पिढ्या आपणासमोर येतात.

१०) ग्रामीण मराठी कथेने ग्रामीण साहित्य चळवळीला जसा हातभार लावला. तसेच मराठी कथेच्या क्षितीज विस्तारीकरणातही तिने योगदान दिले आहे.

=-=-=-=-=

प्रकरण पहिले - संदर्भ


१) (संपा.) पंडित अनंत कुलकर्णी, आनंद यादव, 'मातीतलं मोती,' पुणे,१९७०, पृ.१

२) नागनाथ कोत्तापल्ले, 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध,' पुणे १९८५, पृ.१५.

३) म.द.हातकणंगलेकर, 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका,' जुलै-डिसेंबर १९८०, पृ.५३.

४) रा.रं.बोराडे, 'प्रतिष्ठान,' सप्टेंबर-ऑक्टो.१९६४, पृ.२४

५) (संपा.) अंबादास माडगूळकर, सूर्यकांत घाडेकर, 'मराठी ग्रामीण कथा,' पुणे,१९६७, पृ.५८.


==-=-=-=-=-==